# प्रेसनोट

दि. ०८/०५/२०२४

## अन्य भ्रष्टाचार प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १२७/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, ८, १२, १३ (२) सह भा.दं.वि. कलम ३४. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ७३ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन इंडीया प्रा लि.चे तत्कालीन अधिकारी<br>२. श्रीमनिकंदन राममुर्ती, तत्कालीन उप संचालक, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन इंडीया प्रा लि.<br>३. लार्सन ॲन्ड टुब्रो चे तत्कालीन अधिकारी<br>४. तत्कालीन विविध शासकिय विभागाचे अनोळखी अधिकारी<br>५. इतर अनोळखी खाजगी इसम |
| देवाण घेवाण झालेली लाचेची रक्कम | अंदाजे ७ लाख ७० हजार डॉलर्स (भारतीय चलनातील रुपये ०४ कोटी ५० लाख अंदाजे) |
| अपराध घडला तारीख वेळ व ठिकाण | सन २०१३ ते २०१४ मध्ये पुणे येथे |
| दाखल दिनांक व वेळ | दिनांक ०८/०५/२०२४ रोजी १०.५८ वाजता. |

थोडक्यात माहिती :-

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ही कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन कार्पोरेशन अमेरिका या कंपनीची उप कंपनी आहे. कॉग्नीझंट इंडिया लिमिटेड या कंपनीने मद्रास, तामीळनाडू, पुणे, महाराष्ट्र सह भारतात अनेक ठिकाणी प्रोजेक्ट सुरू केले आहेत. यासाठी सन २०१२ मध्ये या कंपनीने पुण्यात हिंजवडी या ठिकाणी व्यावसायिक इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. या पुण्यातील व्यावसायिक इमारतीचे बांधकाम करण्यासाठी त्यांनी एल अँड टी या कंपनीस कंत्राट दिले होते. कॉग्निझंट इंडियाचे, हिंजवडी पुणे येथील प्रकल्पाच्या इमारतीचे बांधकामाची जबाबदारी कॉग्निझंट कंपनीचे श्रीमनिकंदन राममुर्ती यांच्यावर होती.

श्रीमनीकंदन राममुर्ती व एल ॲन्ड टी या कंपनीने कॉग्निझंट इंडिया टेक्नॉलॉजी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड पुणे या हिंजवडी येथील इमारतींचे बांधकामाचे संदर्भात पर्यावरण विषयक परवानगी मिळवताना तेथील अधिकाऱ्यांशी संगनमत करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून परवानगी मिळविल्या. त्यासाठी त्यांनी नमूद वेळी व ठिकाणी अंदाजे ७,७०,०००/- अमेरिकन डॉलर्स (भारतीय चलनातील अंदाजे चार कोटी पन्नास लाख रुपये ) इतकी लाच अनोळखी अधिका-यांना दिली. याबाबत तक्रारदार यांनी मा. सत्र न्यायालय, पुणे येथे क्रिमिनल एम.ए. नंबर १६१/२०२४ प्रमाणे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, कलम ७, ८, १२, १३(२) या कलमान्वये गुन्हा दाखल होणे साठी अर्ज दिला होता. मा. न्यायालयास या तक्रारीमध्ये प्रथमदर्शनी तथ्य आढळून आल्याने तक्रारदार यांचे अर्जावरून मा. विशेष न्यायालय तथा सत्र न्यायाधीश, पुणे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयास दिले आहेत. त्यानुसार आज रोजी यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक श्री. सुदाम पाचोरकर तपास करत आहेत.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

08/05/2024

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.